# /// प्रकरण - पाचवे ///

## ००० निष्कर्ष आणि समारोप ०००

## // प्रकरण - पाचवे //

## ०० निष्कर्ष आणि समारोप ००

भारता सारख्या विकसनशील देशात वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. देशातील लोकांच्या गरजा सर्व अर्थाने पूर्ण करणे अशक्य होते. या देशात वाढणारी लोकसंख्या ही एका बाजूने संपत्ती तर दुसऱ्या बाजूने ती ओझे ठरते. गेल्या अनेक वर्षांपासून लोकसंख्या आटोक्यात आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत. परंतु त्या प्रयत्नांना म्हणावे तसे यश आलेले नाही.

लोकसंख्या जलद गतीनेवाढू लागली म्हणजे बेकारीची समस्या अधिक उग्र रूप धारण करते. ग्रामीण भागातील वाढत्या लोकसंख्येने उपजीविकेचे साधन म्हणून शेती क्षेत्रात प्रवेश केला. त्या प्रमाणात शेतीचा विस्तार व विकास झाला नाही त्यामुळे ग्रामीण भागात बेकारी व अर्धबेकारी, हंगामी बेकारी निरंतरी बेकारी आढळते.

देशातील उद्योगीकरणाचा वेग कमी असल्यामुळे शहरी विभागात ही बेकारीने उग्र रूप धारण केलेले आहे. कुशल, अकुशल, साक्षर, निरक्षर एवढेच नव्हे तर तांत्रिक ज्ञान आत्मसात केलेले लोक ही बेकार आढळतात. प्रत्येक पंचवार्षिक योजनेच्या सुरवातीला जेवढी बेकारी होती त्यापेक्षा अधिक बेकारी योजनेच्या शेवटच्या वर्षात आढळते.

भारतातील वाढत्या लोकसंख्येमुळे बेकारी बरोबर दारिद्र्यात ही मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. देशातील दारिद्र्य ही मोठी समस्या निर्माण होवून बसलेली आहे. भारतातील ग्रामीण भागातील व शहरी भागातील बेकारी व दारिद्र्य दूर करण्यासाठी व जे लोक बेकारी व दारिद्र्यात आपले जीवनमान जगत आहेत अशा लोकांना

बेकारी व दारिद्र्यातून बाहेर काढण्यासाठी शासनाने अनेक कार्यक्रम राबविलेले आहेत. ग्रामीण भागातील दारिद्र्य व बेकारी दूर करण्यासाठी खास कार्यक्रम व योजना राबविल्या आहेत तर शहरी भागातील बेकारी व दारिद्र्य दूर करण्यासाठी वेगळे कार्यक्रम किंवा योजना राबविल्या आहेत. भारताच्या वाढत्या लोकसंख्येमुळे नागरी करणाची मोठी समस्या निर्माण झालेली आहे. भारतात नागरीकरणाचा वेग झपाट्याने वाढत आहे. भारताच्या १९०१ च्या लोकसंख्येमध्ये नागरी लोकसंख्या ०,९ टक्के होती तर १९९७ मध्ये सरासरी नागरी लोकसंख्या २५.७१ टक्के इतकी आहे. या नागरी लोकसंख्येत सतत वाढ होत आहे.

भारतातील ७५ टक्के लोकसंख्या खेड्यात राहत असली तरी त्याचा ओघ सतत शहराकडे सुरु आहे. शहराचे आकर्षण पण त्याच बरोबर आपले नशीब अजमावण्यासाठी व अधिक पैसा मिळविण्यासाठी व आपले दारिद्र्य दूर करण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील पिळवणुकीने पिडलेले लोक पोटा पाण्याचा आसरा म्हणून शहरी भागात येतात त्याचा परिणाम शहरी लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढहोते. या वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात. त्या बरोबर शहरी भागात दारिद्र्य व बेकारीत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे.

नागरी भागातील दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यासाठी व दारिद्र्यामधील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाकडून अनेक कार्यक्रम व योजना राबविल्या गेल्या आहेत यातील अनेक योजना व कार्यक्रम केन्द्र शासनाने राबविले आहेत.

नागरी भागातील गरीब व लोकांच्यासाठी त्यांना स्वत: रोजगार उपलब्ध व्हावा व त्यांचे दारिद्र्य दूर व्हावे यासाठी केन्द्र सरकारने सप्टेंबर १९८९ साली नागरी भागातील गरीब लोकसंख्यासाठी

स्वयं: रोजगार योजना सुरु केली. या योजनेच्या माध्यमातून राष्ट्रीयकृत बँका करून शहरातील गरीब लोकांना स्वत: रोजगारासाठी वित्त साह्य दिले जाते. त्या योजनेव्दारा गरीब लोकांना कोणत्याही प्रकारचे तारण न घेता अनुदान स्वरूपात कर्ज दिले गेले आहे व घेतलेल्या कर्जातून त्यांनी स्वंयरोजगार किंवा व्यवसाय सुरु करून आपल्या उत्पन्नात वाढ घडवून आणावी हा प्रामुख्याने या योजनेचा उद्देश आहे.

सांगली जिल्ह्यात, सांगली, मिरज, तासगांव, विटा, इस्लामपूर व आष्टा अशा नागरी भागात राष्ट्रीयकृत बँकांनी ही योजना राबवून गरीब लोकांना स्वयं व्यवसायासाठी कर्जपुरवठा केलेला आहे. सांगली जिल्ह्यात १९८६ सालापासून ही योजना राष्ट्रीयीकृत बँकांनी र राबविलेली आहे. प्रत्येक वर्षी जिल्ह्यासाठी जे उद्दिष्ट होते ते उद्दिष्ट पूर्ण करण्यामध्ये राष्ट्रीयकृत बँका यशस्वी झाल्या नाहीत.

१९९१-९२ या आर्थिक वर्षात सांगली शहरासाठी २५७ लाभधारकांना कर्जपुरवठा करण्याचे उद्दिष्ट होते तर त्या वर्षी सर्व राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखांनी १७५ लाभधारकांना कर्जपुरवठा केलेला आहे. मिरज शहरासाठी १७६ लाभधारकांना कर्जपुरवठा करण्याचे उद्दिष्ट होते तर त्यामध्ये फक्त ५२ लोकांना कर्जपुरवठा केलेला आहे. तासगांव शहरासाठी ४४ लाभधारकांना कर्जवाटप करण्याचे उद्दिष्ट होते तर त्यापैकी २५ लाभधारकांना बँकांनी कर्जवाटप केलेले आहे. इस्लामपूर शहरासाठी ५४ लाभ धारकांना कर्जवाटप करण्याचे उद्दिष्ट होते तर त्यामध्ये ४२ लोकांना राष्ट्रीयकृत बँकांनी कर्जवाटप केलेले आहे. विटा शहरासाठी ४० लाभधारकांना कर्जवाटप करण्याचे उद्दिष्ट होते. त्यापैकी ३८ लोकांना कर्जवाटप केलेले आहे. आष्टा शहरासाठी ३५ लोकांना कर्ज देण्याचे उद्दिष्ट होते त्यापैकी १४ लोकांना राष्ट्रीयकृत बँकांनी कर्ज वाटप केलेले आहे. म्हणजेच या योजनेखाली नागरी भागातील गरीब लोकांना स्वयं: रोजगारासाठी कर्जपुरवठा करण्याचे जे उद्दिष्ट होते

ते उद्दिष्ट राष्ट्रीयकृत बँका पूर्णतः शकल्या नाहीत त्याची कारणे पुढील प्रमाणे आहेत.

१) दारिद्र्य रेषेखालील लोकांची अद्यावत यादीचा अभाव : भागातील दारिद्र्य रेषेखालील लोकांची अद्यावत यादी तयार नसल्याने ठराविक उत्पन्न गटातील लोकांचे अर्ज कर्ज मागणीसाठी बँकाकडे येऊ शकत नाहीत त्यामुळे आलेल्या अर्जातून परिपूर्ण अर्ज निवडून बँकांना कर्ज वाटप करावे लागते.

२) गरीब लोकांना योजना माहितीचा अभाव : नागरी भागातील बहुसंख्य गरीब लोकांना शासनाने आपल्यासाठी कोणत्या योजना राबविल्या आहेत यांची माहिती नसते त्यामुळे माहिती अभावी शासकीय योजना चांगल्या असून ही त्यांना त्यांचा फायदा घेता येत नाही.

३) कर्जाची रक्कम अपुरी : या योजनेखाली लाभधारकांना फक्त पाच हजार रुपयाचा कर्जपुरवठा व्यवसायासाठी बँकाकडून केला जातो एवढ्या कमी रक्कमेत व्यवसाय किंवा धंदा सुरु करणे अवघड होते. त्यामुळे लाभधारक कर्ज घेण्यास फार उत्सुक असत नाहीत.

४) कर्जाची थकबाकी : बँकांच्या इतर प्रकारच्या कर्जाप्रमाणे या योजनेखाली लोकांना दिलेल्या कर्जाची थकबाकी मोठ्या प्रमाणात आहेत. त्याचप्रमाणे बँकांना कर्ज वसुलीत अनेक अडचणी येतात त्यामुळे अशा प्रकारचे कर्ज देण्यास फार उत्सुक असत नाहीत.

या प्रमुख कारणामुळे राष्ट्रीयकृत बँका आपले उद्दिष्ट पूर्ण करु शकल्या नाहीत परंतु नागरी भागातील गरीब लोकांना रोजगार उपलब्ध व्हावा त्यांच्या कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ व्हावी व त्यांचे जीवनमान सुधारावे या उद्देशाने सरकारच्या धोरणानुसार राष्ट्रीयकृत बँकांनी कर्ज पुरवठा केलेला आहे.

योजनेचा अभ्यास करण्यासाठी ज्या ५० लाभधारकांनी जी माहिती घेतली त्यापैकी ३८ लाभधारकांनी, पान शॉप, सायकल दुकान, टी स्टॉल, लहान बेकरी, लोहार काम, खानावळ, व्यवसाय, फळे भाजी पाला विक्री, हेअर कटींग सलून किरकोळ लोखंड खरेदी विक्री म्हशी पाच गाठा इ. व्यवसायासाठी या योजनेखाली राष्ट्रीयकृत बँकाकडून कर्ज घेतले त्यामुळे लाभधारकांना कायम स्वरूपात रोजगार मिळू शकला. तसेच कुटुंबातील इतर काही व्यक्तींना रोजगार मिळाला त्यामुळे त्यांच्या कुटुंबातील उत्पन्नात वाढहोवून त्यांच्या जीवनमानात सुधारणा होण्यास मदत झाली.

५० पैकी १२ लाभधारकांना या योजनेचा फायदा झाला नाही या १२ लाभधारकांनी जनरल स्टोअर्स, किराणा माल, दुकान, भांडी भाड्याने देणे, किरकोळ कापड विक्री, लग्न मंडप साहित्य खरेदी करणे, स्पिकर सेट इ. साठी राष्ट्रीयकृत बँकाकडून या योजनेखाली कर्ज घेतले परंतु या धंद्यासाठी ज्यादा रकमेची गरज असते तेवढी रक्कम बँका देऊ शकत नसल्यामुळे लाभधारकांना आपला धंदा व्यवस्थीत किंवा चांगल्या प्रकारे उभा करता आला नाही त्यामुळे त्यांना धंद्यापासून काही फायदा झाला नाही.

ऑक्टोबर १९८९ मध्ये नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी शासनाने नेहरू रोजगार योजना सुरू केल्या नंतर १९९२ नंतर शासनाने नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी स्वयं रोजगार बंद केली व ती १९९२ नंतर नेहरू रोजगार योजनेत समाविष्ठ केली व तिची स्वतंत्र अंमलबजावणी बंद परंतु नेहरू रोजगार योजनेमध्ये नगरपालिकेतील राजकारणी लोकांचा संबंध येत असल्यामुळे राजकारणी व्यक्ती आपल्या संबंधीत लोकानाच या योजनेचा फायदा किंवा लाभ मिळवून देतात त्यामुळे गरीब लोकाना या योजनेचा फायदा मिळू शकला नाही.

राजकीय लोकांच्या संबंधामुळे बँकाना कर्ज वसुलीत अडथळे येतात म्हणूनच शासकीय योजनेचा ख-या अर्थात गरीबाना लाभ होण्यासाठी किंवा गरीबांच्या साठी ज्या योजना आहेत त्यानाच त्याचा लाभ घेता यावा यासाठी राष्ट्रीयकृत बँका मार्फत राबविली जाणारी नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी स्वयं: रोजगार योजना पुन्हा सुरू करावी व त्यामध्ये पुढील प्रकारच्या सुधारणा कराव्यात.

१) कर्ज रक्कमेत वाढ: या योजनेखाली गरीब लोकाना स्वयं रोजगारासाठी कर्जाची रक्कम ५००० रूपयापासून किमान १५००० हजार रूपयापर्यंत करावी.

२) व्याज दर कमी : ही योजना गरीबांच्यासाठी असल्यामुळे गरीब लोकांच्याच उत्पन्नाचा विचार करता व्याजाचा दर १० टक्क्या पेक्षा कमी असावा त्यामुळे त्याना आपल्या मिळणा-या उत्पन्नातून कर्जाची परत फेड करता येईल.

३) कर्ज परत फेडीची मुदत जास्त असावी : या योजनेखाली जोक कर्ज पुरवठा करावयाची त्याच्या परतफेडीची मुदत तीन वर्षा ऐवजी पाच वर्षापर्यंत करावी.

४) अनुदान रक्कमेत वाढ करावी : या योजनेखाली गरीब लोकांना शासनाकडून मिळणा-या अनुदान २५ टक्याऐवजी ३३ टक्के करावे त्यामुळे लाभ धारकाना बँकाच्या कर्जाची परतफेड करणे सोयीचे होईल.

योजना यशस्वी होण्यासाठी करावयाचे प्रयत्न :

नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी असणारी स्वत: रोजगार योजना यशस्वी होण्यासाठी बँका बरोबर शासनाने ही प्रयत्न करणे गरजेचे आहे ते प्रयत्न पुढील प्रमाणे असावेत.

१) दारिद्र्य रेषेखालील लोकांची अद्यावत यादी : शासनाने नागरी भागातील दारिद्र्य रेषेखालील लोकांची परिपूर्ण यादी तयार करावी त्यामुळे बँकांना गरीब लोकांना कर्जपुरवठा करणे शक्य होईल.

२) बँकांच्या प्रवृत्तीत बदल : लोक कल्याणकारी योजनेची उद्दिष्टे ख-या अर्थाने ओळखली जातील यासाठी सर्व सामान्य जनतेच्या मनात बँके विषयी आदर निर्माण होईल या दृष्टीने बँकांनी लाभार्थी पर्यंत पोहोचले पाहिजे.

३) योजनांची माहिती गरीब लोकांना उपलब्ध झाली पाहिजे : गरीब लोकांच्या उन्नतीसाठी ज्या शासकीय योजना असतात त्यांची माहिती गरीब लोकापर्यंत पोहचविण्याचे काम शासनाने केले पाहिजे. त्यासाठी शासकीय खात्या मार्फत रोजगार कार्यक्रम आयोजन करावे त्यामार्फत शासनाच्या कर्ज विषयक योजनाची माहिती द्यावी तसेच बँकांच्या योजनांची माहिती द्यावी.

४) कर्ज वसुलीची जबाबदारी बँका बरोबर शासनाने स्वीकारावी : राष्ट्रीयकृत बँकाच्या मार्फत ही योजना परिणाम कारक पणे व यशस्वीपणे राबावयाची असेल तर बँका मार्फत बेरोजगाराला दिलेली कर्जे वसुली करण्याची ~~जबाबदार~~ जबाबदारी शासनाने बँकाच्या बरोबरीने स्वीकारली पाहिजे तरच बँकाची उदासिनता दूर होवून उत्साह निर्माण होईल.

वेतनावर आधारीत रोजगार की स्वयं रोजगार :

नागरी भागातील~~शहरी~~ दारिद्र्य दूर करण्यासाठी व गरीब लोकांना स्वयं रोजगार सुरु करता यावा यासाठी शासनाने नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी अनेक स्वयं रोजगार योजना सुरु केल्या आहेत व त्या योजने मार्फ त शहरातील गरीब लोकाना धंदा किंवा व्यवसाय सुरु करण्यासाठी बँ-का मार्फत वित्त साहाय्य दिले जात आहे. परंतु शहरी भागातील गरीब लोकाना मुळातच या योजनेची

माहिती नसते. माहिती मिळाली तरी कर्ज मिळविण्यासाठी अनेक कागदपत्रे जमा करावी लागतात ती कागदपत्रे जमा करण्यात अडचणी येतात. त्याच प्रमाणे कोणता धंदा किंवा व्यवसाय करावा या बाबतची त्यांना माहिती नसते. त्याच बरोबर शहरात त्यांना धंदा किंवा व्यवसाय सुरू करण्यासाठी योग्य जागा उपलब्ध होवू शकत नाही. जागा उपलब्ध झाली तर नगरपालिके कडून लवकर परवाना मिळत नाही. त्यामुळे त्यांना धंदा किंवा व्यवसाय सुरु करता येत नाही. त्यामुळे त्यांना स्वयं रोजगार योजनेचा लाभ घेता येत नाही. तसेच बँका देखील अशा प्रकारचे कर्ज देण्यास फार उत्सुक असत नाहीत. त्यामुळे शासनाने नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी असणा-या स्वयं रोजगार योजना बंद करुन त्यांना वेतनावर आधारीत रोजगार पुरवावा म्हणजेच नागरी भागातील गरीब लोकाना धंद्यासाठी किंवा स्वयं रोजगारासाठी कर्ज पुरवठा करण्याऐवजी शासनाने नागरी भागात वेगवेगळी कामे हाती घेऊन त्या कामाद्वारे गरीब लोकाना वेतनावर आधारीत रोजगार उपलब्ध करुन द्यावा त्यामुळे त्याना काम मिळून उत्पन्न मिळेल व राहणीमानात सुधारणा होण्यास मदत होईल.

<u>सारांश</u> रुपाने आपणास असे म्हणता येईल की नागरी भागातील गरीबीचे प्रमाण करण्यासाठी शासनाच्या धोरणानुसार बँकाकडून ज्या स्वयं रोजगार योजना राबविल्या जातात त्या योजनेची अंमलबजावणी व्यवस्थीत होत नाही. तसेच गरीब लोकाना धंदा किंवा व्यवसाय सुरु करण्यासाठी अनेक समस्याना तोंड द्यावे लागते. त्यामुळे स्वयं रोजगार योजनेचा लाभ गरीबाना मिळत नाही व त्याच्या गरीबीचे प्रमाण कमी होत नाही त्यामुळे शासनाने अशा योजना बंद करुन नागरी भागातील गरीब लोकाना वेतनावर आधारीत रोजगार निर्माण करावा. यासाठी नागरी भागात रस्ते बांधणी, रस्ते दुरुस्ती

खेळासाठी क्रीडांगणे, बांधणे, स्वच्छता, गटार बांधकाम, शाळा बांधकाम, बाग बगीच्या निर्माण करणे शहरात विविध ठिकाणी झाडे लावणे, लहान मुलांच्यासाठी क्रीडा संकुल उभारणे, वाचनालयासाठी इमारत बांधणे इ. कामे हाती घेऊन नागरी भागातील लोकांना रोजगार उपलब्ध करुन द्यावा. त्यामुळे त्यांना नियमीत रोजगार मिळून आय उत्पन्न वाढीस मदत होईल व त्यांच्या जीवनमानात सुधारणा होण्यास मदत होईल.